**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०८ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे शपथपुर्वक निवेदन करतो की,**
माझे नाव – प्रशांत परशुराम जाधव, वय – ४४ वर्षे,
व्यवसाय – नोकरी, पो.हवा./२७०
रा. – सध्या ने. विजयदुर्ग पोलीस स्टेशन, ता. देवगड

**<u>शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री. एम.जी. काळदाते यांचे मार्फत.</u>**

०१. सन २०१६ ते सन २०२३ या दरम्यान माझी नेमणुक पोलीस स्टेशन देवगड येथे पोलीस नाईक या पदावर होती. माझ्याकडे अपराध क्र.१६/२०२२ या गुन्हयाचा तपास देण्यात आला होता. मला फिर्यादी याची फिर्याद, सीसीटीएनएसची प्रत देण्यात आली होती. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले. मी घटनास्थळी रवाना झालो. घटनास्थळी दोन पंचांना बोलावून घेतले. फिर्यादी यांनी दर्शविल्याप्रमाणे घटनास्थळ पंचनामा केला. आता मला **नि.क्र.५०** येथील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी व पंच यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. आरोपी यांना फौ. प्र.संहिता कलम ४१(१) प्रमाणे नोटीसा दिल्या. आता मला नोटीसा दाखविण्यात आल्या. त्यावर माझी व आरोपी क्र.१ ते ४ यांच्या सह्या आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. नोटीशीस **नि.क्र.६७ ते ७०** देण्यात येते. साक्षीदारांची साक्षी टिपण नोंदवले. वैदयकीय अधिकारी यांना पत्र दिले. वैदयकीय प्रमाणपत्र प्राप्त करुन सामील केले. प्रस्तुत गुन्हयातील आरोपी यांनी गुन्हयात वापरलेले जंगली दांडे पोलीस स्टेशन येथे आणून जमा केले. सदर दांडे पंचांसमक्ष जप्त करुन त्याबाबत पंचनामा केला. आता मला जप्ती पंचनामा **नि.क्र.३३** दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी व दोन पंच तसेच आरोपी यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. दांडा मुद्देमाल कारकून यांच्या ताब्यात देऊन त्याबाबत मुद्देमाल पावती फाडली. आता मला मुद्देमाल पावती दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी व मुद्देमाल कारकून यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. मुद्देमाल पावतीस **नि.क्र.७१** देण्यात येते. घरपत्रकाचे उतारे घेतले. त्याकरिता ग्रामसेवक यांना पत्र दिले होते. आता मला पत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर माझी व ग्रामसेवक यांची सही असून त्यातील

मजकूर खरा व बरोबर आहे. पत्रास **नि.क्र.७२** देण्यात येते. आरोपी त्यांच्या विरोधात गुन्हा केल्याचा पुरावा निर्माण झाल्याने आरोपी यांच्या विरोधात दोषारोपपत्र दाखल केले. मी प्रस्तुत प्रकरणी जप्त केलेले गोलाकार जंगली दांडे पाहिल्यास ओळखू शकतो. आता मला **आर्टीकल ए** येथील जंगली दांडे दाखविण्यात आले. ते तेच आहेत. आरोपी यांना पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी न्यायालयात उपस्थित आहेत.

सरतपास पूर्ण.

<u>आरोपी क्र.१ ते ४ तर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.के. के.मराठे यांचे मार्फत.</u>

०२. गुन्हयाचा तपास माझ्याकडे आल्यापासून पुर्ण होण्याकरिता एक महिना कालावधी लागला. मी दि.२६/०२/२०२२ या दिनांकास प्रस्तुत गुन्हयात आरोपी यांची चूक असावी या निष्कर्षावर पोहोचलो होतो. माझ्या तपासात दरम्यान मी साक्षीदारांचे टिपण नोंदवले, वैदयकीय प्रमाणपत्र प्राप्त केले, घरपत्रकाचे उतारे प्राप्त केले, मुद्देमाल जप्त केला, आरोपी यांच्याकडे चौकशी केली, जप्त दांडे वैदयकीय अधिकारी यांना दाखवून त्यांचे मत घेतले. हे म्हणणे खरे आहे की, मी दि.२६/०२/२०२२ या एकाच दिवशी सर्व साक्षीदारांचे टिपण नोंदवले. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत गुन्हयातील वैदयकीय प्रमाणपत्र देखील मी दि.२६/०२/२०२२ या दिवशी प्राप्त केला. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथित घटनास्थळ पंचनामा देखील दि.२६/०२/२०२२ या दिवशीच पुर्ण केला. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी यांना नोटीस देखील दि.२६/०२/२०२२ या दिवशीच दिल्या. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील घरपत्रक उतारे दि.२६/०२/२०२२ या दिवशी प्राप्त केले होते. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्याकरिता जे काही आवश्यक आहे ते सर्व मी दि.२६/०२/२०२२ या दिवशी प्राप्त केले होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी व जखमी यांना जप्त दांडा दाखविल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा प्रस्तुत प्रकरणी हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, महिन्याभराच्या तपासात जप्त दांडे फिर्यादी व जखमी यांना दाखविण्यास मला काही अडचण नव्हती. मी आरोपी यांना दिलेल्या नोटीसमध्ये त्यांनी कोणतीही वस्तू सोबत आणावी असे कळविले नव्हते. मुद्देमाल जप्ती

पंचनामा माझ्या म्हणण्याप्रमाणे पोलीस स्टेशन देवगड येथे करण्यात आला आहे. सदर दिवशी देवगड पोलीस स्टेशन येथे कोणी व्यक्ती दांडे घेऊन आल्याबाबतची स्टेशन डायरी नोंद मी पाहिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २६ रोजी सायंकाळी माझ्या असे लक्षात आले की, तपासाकामी बाकी गोष्टीची पुर्तता झाली आहे, केवळ दांडे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे दिनांक २७/०२/२०२२ रोजीचा नि.क्र.३३ येथील खोटा पंचनामा तयार करुन त्यावर आरोपीची सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की , पोलीस स्टेशनमध्ये हजर असलेल्या व्यक्तीची त्याच्या मनाविरोधात कोणत्याही कागदावर सही घेतली जात नाही. एखादया व्यक्तीची मनाविरोधात सही घेण्याची कायद्यात तरतुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांना मारहाण करुन धमकावून त्यांच्या नि.क्र.३३ येथे खोटया पंचनाम्यावर सह्या घेतल्या आहेत.

०३. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत प्रकरणातील साक्षीदार म्हणून टिपणे घेतलेले सर्व व्यक्ती फिर्यादी यांचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत प्रकरणी टिपण नोंदवलेल्या सर्व साक्षीदारांचे आडनाव ताम्हणकर असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, कुडाळकर आडनाव असणारी महिला फिर्यादी हिची भावजय आहे. हे म्हणणे खरे नाही की, सचिन ताम्हणकर हा फिर्यादी यांचा नातेवाईक आहे. हे म्हणणे खरे आहे की, उर्वरित साक्षीदार फिर्यादी यांचे नातेवाईक आहेत. दांडा डॉक्टरांना दाखवून त्याची खात्री करुन घेतल्याबाबत दि.१९/०३/२०२२ रोजीच्या पत्रावर नमूद आहे. डॉक्टरांना दांडा दाखवून त्याची खात्री करुन घेतल्याची नोंद केस डायरीला केली आहे. तशी केस डायरी न्यायालयात हजर केली नाही. राजेंद्र रघुनाथ ताम्हणकर यांनी त्यांचा जबाब देतेवेळेस मला आनंद याने दरवाजावर लाथ मारली त्यामुळे दरवाजा उघडला, आनंद याने मला थप्पड मारली त्यानंतर काशीनाथ ताम्हणकर याने येऊन दांडे आपटले व शिवीगाळ करत बाहेर गेला हा मजकूर सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, राजेंद्र रघुनाथ ताम्हणकर हा गावच्या तलाठी कार्यालयात कोतवाल म्हणून काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे राजेंद्र रघुनाथ ताम्हणकर याची पोलिसांसमवेत उठबस असते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी त्याची खोटी फिर्याद नोंदवून साक्षीदारांचे टिपण नोंदवले. आता मला वेदिका ताम्हणकर यांच्या मी नोंदवलेल्या

जबाबातील अधोरेखांकित भाग दाखविण्यात आला. सदर मजकूर वेदिका ताम्हणकर यांनी जबाब देतेवेळेस मला सांगितला होता. वेदिका ताम्हणकर हिने मी सोडवायला गेले असता सरिता व अरुण यांनी मला ढकलले हा भाग जबाब देतेवेळेस मला सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुत प्रकरणी आरोपी यांच्या विरोधात पूर्वग्रह दुषित पध्दतीने तपासकाम केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मुद्देमाल खोटा जप्त केला आहे. हे म्हणणे खरे नाहीकी, साक्षीदारांचे टिपण खोटे नोंदवले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकूर खोटा असून आज मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-

(श्रीकांत एस. पचंडी)
न्यायंडाधिकारी वर्ग-१, देवगड

दि.२५/०९/२०२५